-: प्रेसनोट दिनांक २८/११/२०१९ :-

**राजेश अनिल घुले, वय ४३, सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र विद्युत वितरण कंपनी, शाखा कार्यालय - कोडोली शहर, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर, वर्ग - २ यांनी लाच मागणी करून स्विकारलेबाबत....**

---

यातील तक्रारदार यांचे कोडोली, ता.पन्हाळा येथे इलेक्ट्रीक शॉप असून ते इलेक्ट्रीक कॉन्ट्रक्टर आहेत. त्यांनी कोडोली गावातील राधाकृष्ण अपार्टमेंट मधील एकुण १४ फ्लॅट धारकांचे नविन वीज जोडणीचे काम घेतले होते. त्या कामानिमीत्य तक्रारदार यांनी एम.एस.ई.बी. शाखा कार्यालय (कोडोली अर्बन) कोडोली, ता.पन्हाळा, जि. कोल्हापूर येथे अर्ज दिलेला होता. परंतू त्याप्रमाणे फ्लॅट धारकांचे नविन वीज (मीटर) जोडणी केली नसल्याने तक्रारदार यांनी दि. २६/११/२०१९ रोजी एम.एस.ई.बी. शाखा कार्यालय (कोडोली अर्बन) कोडोली येथील सहायक अभियंता घुले यांची भेट घेवून राधाकृष्ण अपार्टमेंट मधील १४ फ्लॅट धारकांचे नविन वीज (मीटर) जोडणीबाबत चर्चा केली. त्यावेळी सहायक अभियंता घुले यांनी तक्रारदार यांना राधाकृष्ण अपार्टमेंट मधील १४ फ्लॅट धारकांचे नविन वीज (मीटर) जोडणी करणेकरीता प्रत्येक फॅलट धारकांचे २०००/- रुपये प्रमाणे द्यावे लागतील, तरच मी सर्व फ्लॅट धारकांचे नविन वीज (मीटर) जोडणी करुन देईन, नाहीतर देणार नाही असे सांगितले. त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांना प्रत्येकी २०००/- रुपये काही जमणार नाही असे सांगितलेवर सहायक अभियंता घुले यांनी मला सर्वांचे मिळून ५०००/- रुपये द्या, मगच मी सर्व फ्लॅट धारकांचे नविन वीज (मीटर) जोडणी करुन देतो असे म्हणुन रु.५,०००/- लाचेची मागणी केली होती. सदरबाबत तक्रारदार यांनी दि. २६/११/२०१९ रोजी तक्रारी अर्ज दिला होता.

तक्रारदार यांचे तक्रारीप्रमाणे दोन पंच साक्षीदारांचे समक्ष दि. २७/११/२०१९ रोजी एम.एस.ई.बी. शाखा कार्यालय - कोडोली शहर येथे सहाय्यक अभियंता घुले यांचे लाच मागणीबाबत पडताळणी केली असता, सहाय्यक अभियंता घुले यांनी तक्रारदार यांचे अर्जाप्रमाणे राधाकृष्ण अपार्टमेंटमधील १४ फ्लॅट धारकांचे नविन वीज (मीटर) जोडणी करून दिली असुन त्यांचे बक्षिस म्हणुन तक्रारदार यांचेकडे रु. ५,०००/- लाच मागणी केलेचे निष्पन्न झाले.

त्यानुसार आज दि. २८/११/२०१९ रोजी एम.एस.ई.बी. शाखा कार्यालय - कोडोली शहर येथे सहाय्यक अभियंता घुले यांचेविरूध्द सापळा कारवाई आयोजित केली असता, सहाय्यक अभियंता घुले यांनी तक्रारदार यांचेकडुन लाच रक्कम रूपये ५,०००/- स्विकारल्याने त्यांना रंगेहात पकडणेत आले असलेने यांचेविरुध्द कोडोली पोलीस ठाणे, जि. कोल्हापूर येथे गुन्हा दाखल करणेची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कारवाई श्री. राजेश बनसोडे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे, श्रीमती सुषमा चव्हाण, अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे व श्री. आदिनाथ बुधवंत, पोलीस उपअधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांचे मार्गदर्शनानुसार श्री. जितेंद्र पाटील, पोलीस निरीक्षक, सफौ शामसुंदर बुचडे, पोकॉ रूपेश माने, अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

**सर्व नागरिकांना आवाहन करणेत येते की,लाचेच्या अथवा अपसंपदेबाबत तक्रारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कंमाकावर संपर्क साधावा.**

**१)मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१**

**२)मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी कमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.**

**३)श्री.आदिनाथ बुधवंत, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर मो.नं. ९०११२२८३३३, कार्यालय दुरध्वनी कमांक - ०२३१/२५४०९८९.**

**४)हेल्पलाईन टोल फ्री कमांक:- १०६४.**

**५)व्हॉटस अप कमांक :- ७८७५३३३३३३.**